# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक ६० वा शनिवार दि.०३ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


### विद्यार्थ्यांनी ध्येय प्राप्तीसाठी प्रयत्नशील असावे : डॉ. सुनिता दीक्षित

सेलू : विद्यार्थ्यांनी यश प्राप्तीसाठी ज्ञाननिष्ठा, गुरुनिष्ठा, अध्ययननिष्ठा, एकाग्रता चतु:सूत्रीचा नेहमीच वापर करावा. विद्यार्थ्यांना गुरुजनांप्रती नेहमीच आदर असावा. नम्रता अंगी असावी. ध्येय मोठे ठेवावे आणि ध्येयप्राप्तीसाठी नेहमीच प्रयत्नशील असावे, असे प्रतिपादन डॉ. सुनिता दीक्षित (देशपांडे) यांनी केले. श्रीमती लक्ष्मीबाई लालजी रामजी नूतन कन्या प्रशाला व श्रीमती तेजीबाई कन्हैयालाल अग्रवाल उच्च माध्यमिक विभाग गुणवंत विद्यार्थिनी सत्कार सोहळा प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. दीक्षित बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम. लोया यांची उपस्थिती होती.

## गाड्याच फोडायच्या तर बड्या नेत्यांच्या फोडा

परभणी : अमोल मिटकरी आणि जितेंद्र आव्हाड यांच्यासारख्या लोकांच्या गाड्या काय फोडता. गाड्याच फोडायच्या झाल्यास जेष्ठ नेते शरद पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना उबाठा पक्षाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गाड्या फोडा असे वादग्रस्त विधान गंगाखेड येथील सभेला संबोधीत करत असताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.



वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. आंबेडकर कालपासून परभणी जिल्ह्याच्या विविध भागात ओबीसी आरक्षण बचाव यात्रेनिमित्ताने सभा घेत आहेत. गंगाखेड येथे शुक्रवार, दि. २ ऑगस्ट रोजी ॲड. आंबेडकर यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत त्यांनी वरील विधान केले.

# ५०,००० कोटींच्या देशातील ८ हायस्पीड कॉरिडॉरला केंद्राची मान्यता; महाराष्ट्रात 'हा' कॉरिडॉर बांधला जाणार!

केंद्र सरकारने देशात ८ नवीन हायस्पीड रोड कॉरिडॉर बांधण्यास मान्यता दिली आहे. या ८ नवीन हायस्पीड रोड कॉरिडॉरवर केंद्र सरकार ५० हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च करणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात बांधण्यात येणाऱ्या या रस्त्यांमुळे लोकांचा वेळ तर वाचणार आहेच, शिवाय अनेक शहरांमधील अंतर देखील कमी होणार आहे. याशिवाय इंधनाची बचत होण्यासही मदत होणार आहे. आग्रा-ग्वाल्हेर, कानपूर-लखनऊ, खरगपूर-मोरेग्राम, रायपूर-रांची, अहमदाबाद, पुणे, नाशिक, अयोध्या आणि गुवाहाटी या ८ नवीन कॉरिडॉरचे बांधकाम होणार आहे.

आर्थिक घडामोडींच्या मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक घडामोडींच्या मंत्रिमंडळ समितीने शुक्रवारी (ता.२) या नवीन ८ कॉरिडॉरच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. या ८ हायस्पीड कॉरिडॉरची एकूण लांबी ९३६ किमी असणार आहे. विशेष म्हणजे ८ हायस्पीड कॉरिडॉर तयार करण्यासाठी केंद्र सरकारला ५०,६५५ कोटी रुपये खर्च येणार आहेत. केंद्र सरकारने दावा केला आहे की, या रस्ते प्रकल्पांमुळे ४.४२ कोटी दिवसांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारही निर्माण होणार आहे. हे आहेत आठ हायस्पीड रोड कॉरिडॉर प्रकल्प



- ६ लेन आग्रा-ग्वाल्हेर नॅशनल हाय स्पीड कॉरिडॉर
- ४ लेन खारापूर-मोरेग्राम राष्ट्रीय हायस्पीड कॉरिडॉर
- ६ लेन थरड-दिशा-मेहसाणा-अहमदाबाद राष्ट्रीय हायस्पीड कॉरिडॉर
- ४ लेन अयोध्या रिंग रोड
- ४ लेन पाथळगाव आणि गुमला रायपूर-रांची नॅशनल हाय स्पीड कॉरिडॉर
- ६ लेन कानपूर रिंग रोड
- ४ लेन उत्तर गुवाहाटी बायपास आणि सध्याच्या गुवाहाटी बायपासचे रुंदीकरण
- ८ लेन एलिव्हेटेड नाशिक फाटा-खेड कॉरिडॉर

आग्रा-ग्वाल्हेर कॉरिडॉरला ४,६१३ कोटी खर्च

आग्रा-ग्वाल्हेर या ८८ किमी लांबीच्या ग्रीनफिल्ड कॉरिडॉरमध्ये ६ लेन असणार आहे. हा कॉरिडॉर बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बीओटी मॉडेल) या तत्वावर उभारला जाणार आहे. हा रस्ता तयार करण्यासाठी ४,६१३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. श्रीनगर ते कन्याकुमारी महामार्गावर पडणाऱ्या या दोन शहरांदरम्यान बांधण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गावर सध्या प्रचंड गर्दी होत आहे. यामुळे या नवीन प्रकल्पामुळे आग्रा ते ग्वाल्हेरमधील अंतर सुमारे ७ टक्क्यांनी कमी होणार असून, प्रवासाचा वेळ सुमारे ५० टक्क्यांनी कमी होणार आहे. याच पद्धतीने सात अन्य कानपूर-लखनऊ, खरगपूर-मोरेग्राम, रायपूर-रांची, अहमदाबाद, पुणे, नाशिक, अयोध्या आणि गुवाहाटी कॉरिडॉरचे देखील बांधकाम होणार आहे.

### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर-बार्शी रोड नॅशनल हायवे कामाची केली पाहणी रस्त्याचे काम वेळेत व गुणवत्ता पूर्ण करण्याच्या केल्या सूचना

लातूर/ प्रतिनिधी : - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी लातूर-बार्शी रोड नॅशनल हायवे कामाची पाहणी करून रस्त्याचे काम वेळेत व गुणवत्ता पूर्ण करण्याच्या संबंधिताना सूचना केल्या. यावेळी लातूरचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत, उपअभियंता प्रल्हाद कोरे, शाखा अभियंता दत्ता वाघ, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## ४ ऑगस्ट रोजी लातूरमध्ये 'स्वामुक्टा' प्राध्यापक संघटनेचा जिल्हा मेळावा

लातूर :- उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून भारतीय संविधानातील तरतुदींमध्ये घरगुती पद्धतीने बदल करून सुरु असलेल्या मनमानी कारभाराच्या विरोधात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (एमफुक्टो) विविध कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. प्राध्यापक महासंघाने पुकारलेल्या या आंदोलनास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत एमफुक्टो संलग्नित 'स्वामुक्टा' संघटनेचा जाहीर पाठींबा असून 'स्वामुक्टा' संघटना या आंदोलन कृती कार्यक्रमात सक्रीयपणे सहभागी राहणार आहे. या आंदोलनाची जनजागृती करण्यासाठी संघटनेच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीच्यावतीने रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, एम.सी. व्हि.सी. सभागृह, लातूर येथे जिल्ह्यातील प्राध्यापकांचा मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यास संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सूर्यकांत जोगदंड, उपाध्यक्ष डॉ. डी. एन.मोरे, सचिव डॉ. विजय भोपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, डॉ. करुणा देशमुख, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. एल. पी. शिंदे, डॉ. विष्णु पवार आदि मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. आंदोलनाच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. - विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसुचनेची जशास तशी अंमलबजावणी करावी. - पीएच.डी व एम.फील करिता देय असलेल्या प्रोत्साहनपर वेतनवाढी पुर्ववत कराव्यात. - सहयोगी प्राध्यापक पदावरील पदोन्नतीचे लाभ मुलाखत दिनांकाऐवजी पात्रता दिनांकापासून द्यावेत. - एम.फिल. धारक प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ तात्काळ देऊन त्यांचा छळ थांबवावा. - १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. - पूर्णवेळ प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी. लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, सचिव डॉ. अमोल लाटे, डॉ. धोंडिबा भुरे, डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. मनोजकुमार सोमवंशी, डॉ.गोपाळ मोघे, डॉ.रावसाहेब इंगळे, डॉ. क्रांती मोरे, डॉ. आर डी. खाकरे, डॉ. पांडुरंग मगर आणि प्रसिद्धी प्रतिनिधी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले आहे.

### भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांच्या हस्ते प्रभाग ११ व १२ मधील विकास कामांचा शुभारंभ



लातूर - लातूर शहरातील प्रभाग ११ व १२ मधील विविध विकास कामांचा शुभारंभ भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या हस्ते १ ऑगस्ट रोजी करण्यात आला. प्रामुख्याने अजिंठानगर भागात रस्ते कामाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम भाजप शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांच्या प्रयत्नातून होत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी देवीदास काळे यांचा सत्कार करून आभार मानले. सदरची विकासकामे माग लागल्यामुळे नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. यावेळी नगरसेविका तथा महिला मोर्चाच्या अध्यक्षा रागिणी यादव, नगरसेवक विशाल जाधव, माजी नगरसेवक तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य रवी सूडे, मंडल अध्यक्ष आबा चौगुले व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा भूतान देशाकडून घ्यावी.प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड

लातूर :- बौद्ध धर्मियांचे बहुसंख्य प्रमाण असलेला, सर्वाधिक आनंदी जीवन जगणाऱ्या लोकांचा भूतान हा देश लहान असला तरी मानवीयतेच्या दृष्टिकोनातून महान ठरतो. दैनंदिन जीवन जगताना अनेक ज्वलंत प्रश्न आपल्याला भेडसावतात अशा स्थितीतही आपण भूतान पासून आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा घ्यावी असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्राचार्य प्राचार्य डॉ.संजय गवई यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. नुकतेच ते भूतान येथील नॉरबुलिंग रायटर कॉलेज, कांगलुंग येथे इस्टर्न हिमालयीन टूर्स अँड ट्रॅव्हल्स, युवा सक्षमीकरण व संशोधन परिषद तसेच कॉमर्स अँड मॅनेजमेंट असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता आणि व्यवसाय स्थिरताया विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना म्हणाले की, धूम्रपानावर बंदी घालणारे भूतान हे जगातील पहिले राष्ट्र आहे. तंबाखू नियंत्रण कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान किंवा तंबाखू विक्री बेकायदेशीर आहे. या कायद्याचे तेथील लोक स्वयंस्फूर्तपणे पालन करतात हे विशेष आहे. स्वच्छता, शिस्त, संयमीपणा, सहिष्णुवृत्ती हा येथील लोक जीवनाचा पाया आहे. भूतानमध्ये राजधानी असलेले थिंपू शहर आणि पुनाखा हे दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. या देशाने नैसर्गिक साधनसंपदेची जपणूक अत्यंत तळमळीने केली आहे. पर्यावरणाचे जपण करण्यातच लोकांना मनापासून समाधान वाटते. त्याचे कारण म्हणजे त्यांच्यावर पूर्वापार होत आलेले संस्कार होय. येत्या काळात भूतान आता संख्येपेक्षा गुणवत्तेकडे लक्ष देणार आहे. हे त्यांच्या प्रगतशील वाटचाली मधून लक्षात येते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, भूतान देशातील लोक सहिष्णू असल्यामुळे त्यांचा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे असे सांगून अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



### आपदग्रस्त शेतीपीकासह पडझड झालेल्या घरांचे तात्काळ पंचनामे करा आमदार भीमराव केराम यांच्या तहसीलदाराना सूचना

किनवट/शेख शौकत :-मागील आठ दहा दिवसापासून किनवट तालुक्यात पावसाचे थैमान सुरु आहे. काही महसुली मंडळात तर वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होऊन खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. या पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली. या नुकसानीची तात्काळ दखल घेत आमदार भीमराव केराम यांनी किनवट व माहूरच्या तहसीलदाराला पत्र देऊन नुकसान बाधित शेती क्षेत्रासह पडझड झालेल्या घरांचे पंचनामे करून आपत्तकालीन सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना केल्या आहेत.



गेल्या आठदहा दिवसापासून किनवट शहरासह तालुक्यात जोरदार पाऊस बरसत आहे. काही महसुली मंडळात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत तर अनेक घरांची पडझड झाली आहे. यासंदर्भात नुकसान बाधित शेतकऱ्यांना तसेच पडझड झालेल्या कुटुंबीयांना शासनाचे अर्थसहाय्य मिळवून देण्याच्या हेतूने आमदार भीमराव केराम यांनी किनवट व माहूरच्या तहसीलदाराना नुकतेच पत्र दिले असून आपतग्रस्त शेतीक्षेत्रातील पिकांची तसेच पडझडं झालेल्या घरांची महसूल व कृषी कर्मचाऱ्यामार्फत प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत तसेच आपत्कालीन सर्वतोपरी शासनमदत पुरविण्यासाठी तातडीने आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचना आमदार भीमराव केराम यांनी केल्या आहेत.

### निजामकालीन शाळेला स्वातंत्र्य काळात वैभवप्राप्त मिळवून देणारे मुख्याध्यापक सेवानिवृत्त

मुरुम (प्रतिनिधी) : भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेल्या जिल्हा परिषद मुलांची प्रशालेत अनेक मुख्याध्यापकांनी चांगला कार्यकाळ बजावला. प्रत्येकांने आपल्या कार्यकाळात शाळेची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला. स्पर्धेच्या काळात बदलत्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा दर्जा आणि जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना दिले जाणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण यामुळे या परिसरातील अनेक पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद प्रशालेत शिक्षणासाठी पाठवित असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने यांनी केले. रत्नमाला मंगल कार्यालयात गुरुवारी (ता. १) रोजी जिल्हा परिषद प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक मधुकर ममाळे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने होते. यावेळी प्रमुख अतिथी उमरगा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, लोहारा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुभाष चव्हाण, उमरगा विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, अँड. प्रविण तोतला, भाजपा उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिणीयार, सोलापूरचे माजी पोलीस उपअधीक्षक कमलाकर पाटील, सांगोलाचे उद्योजक सुभाष दिघे, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. विजयानंद बिराजदार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चांदपशा गवंडी, उपाध्यक्ष राचप्पा दुर्गे, शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष विलास कंटेकुरे, रोटरी क्लब मुरुम सिटीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, माजी नगरसेवक अजित चौधरी आदींचे प्रमुख उपस्थिती होती.



सत्काराला उत्तर देताना मंमाळे म्हणाले की, गेल्या ३३ वर्षाच्या काळात विविध शाळेत काम करण्याची मला संधी मिळाली. प्रत्येक ठिकाणी गुणवंत विद्यार्थी तयार करण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केला. या प्रशालेत शिक्षक व पालकांच्या सहकाऱ्यांनेच पटसंख्या व गुणवत्ता वाढविता आली. भविष्यात विद्यार्थ्यांची गुणवत्ता असेल तरच ते कुटुंबाचे आधार होऊ शकतात म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी भविष्यातही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी धनराज फुरडे, शिवकुमार बिराजदार, सुभाष चव्हाण, प्रविण तोतला, श्रीकांत मिणीयार, कमलाकर मोटे, आश्विनी ममाळे, डॉ. अमरदीप ममाळे, राचप्पा दुर्गे आदींनी मनोगते व्यक्त केली. संतोष कडगंचे, हरिभाऊ माकने, सुभाष व्हटकर, उमाकांत तांदळे, मोहन राठोड, राजू पवार, बाळासाहेब कांबळे, संगीता घुले, संगीता माने, अनिशा फुगटे, निर्मला परीट आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रविण ठाकूर तर आभार शिवाजी कावळे यांनी मानले. मुरुम, ता. उमरगा येथील शाळेतील मुख्याध्यापक मधुकर ममाळे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सत्काराप्रसंगी मान्यवर व अन्य शिक्षकवृंद.

## संपादकीय....

# गडकरींच्या गुगलीचे गारूड!

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना नितीन गडकरी यांनी लिहिलेल्या पत्रातील मुद्दे अयोग्य आहेत असे एकही सज्ञान आणि सुविद्या व्यक्ती म्हणू शकणार नाही. हे पत्र आयुर्विमा आणि वैद्याकीय विमा यांच्या हप्त्यांवर आकारण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा कराबाबत आहे. सद्या:स्थितीत या दोन्हीही विम्यांवर १८ टक्के इतका सणसणीत कर आकारला जातो. गडकरी यांस नागपुरातील आयुर्विमा महामंडळाच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी या संदर्भात निवेदन दिले आणि या कराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यातील कर्मचारी हा घटक महत्त्वाचा. अशासाठी की विमा काढणारे मध्यमवर्गीय या अन्याय्य कराबाबत मिठाची गुळणी घेण्यात धन्यता मानत असताना विमा महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मात्र या कराबाबत तीव्र नाराजी नोंदवावीशी वाटली; ही बाब कौतुकास्पद. त्याहूनही अधिक कौस्तुकास्पद गडकरी यांनी या मागणीची घेतलेली दखल. त्यांनी या कर्मचाऱ्यांचे निवेदन स्वीकारताना शाब्दिक सहानुभूती व्यक्त करून हा मुद्दा सोडून दिला नाही. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांस पत्र लिहिले आणि हा कर मागे घेतला जावा, अशी मागणी केली. गडकरींचे कौतुक या मागणीसाठी. ही मागणी मान्य होणारी नाही आणि तीबाबत अर्थमंत्री असल्या तरी निर्मलाबाईदेखील काही करू शकत नाहीत, हे माहीत असतानाही त्यांनी हे पत्र लिहिले. खरे तर त्यावर निर्णय अपेक्षित असेल तर हे पत्र पंतप्रधानांनाच लिहावयास हवे, हे गडकरी यांस ठाऊक असणारच. खेरीज निर्मलाबाई या काही आपल्यासारख्या धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या नाहीत, त्या पंतप्रधानांच्या शब्दाबाहेर नाहीत, हेही गडकरी यांस ठाऊक असेलच. तरीही त्यांनी हे पत्र अर्थमंत्र्यांकडे पाठवले कारण त्यांना डावलून निर्णयासाठी हा विषय पंतप्रधानांकडे नेला असता तर निर्मलाबाईंचा अधिक्षेप झाला असता. तसे काही करण्याची गरज नव्हती. गडकरींनी अर्थमंत्र्यांकडे करकपातीची मागणी केली आणि त्याची रास्त प्रसिद्धी झाल्याने हा विषय योग्य प्रकारे चर्चेत आला. तो महत्त्वाचा असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते. आपल्या देशात अद्यापही विमा आणि आयुर्विमा यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यातही वैद्याकीय विमा– तोही वैद्याकीय उपचारांच्या खर्चाचे आव्हान पेलेल इतक्या रकमेचा– असलेल्यांची संख्या आणखी कमी. दरवर्षी भरभक्कम रक्कम खर्च करून वैद्याकीय विमा जिवंत ठेवावा लागतो. ''वैद्याकीय विमा घेतला आणि त्याची गरजच लागली नाही'' असे म्हणत पैसे 'वाया' गेल्याची तक्रार करणारे आपल्याकडे सुशिक्षितांतही सर्रास भेटतात. या विम्याच्या गरजेबाबत तितकी जागृती आपल्याकडे नाही. त्यामुळे घरातील कोणी आजारी पडले की उपचारांच्या खर्चाची रक्कम उभी करण्यात इतरांची दमछाक होते. मध्यमवर्गीयांस सरकारी रुग्णालये नकोशी असतात आणि तारांकित खासगी परवडत नाहीत. म्हणून मग 'ना इकडच्या ना तिकडच्या' अशा कोणा रुग्णालयांत उपचारार्थ दाखल व्हावे लागते. हे असे होते कारण वैद्याकीय विम्याचा अभाव. त्यात आपल्या देशात इंग्लंडप्रमाणे उपचारांची हमी देणारी 'राष्ट्रीय आरोग्य सेवा'ही नाही. परिणामी अशा आजारी व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या हालास पारावर राहात नाही. अशा परिस्थितीत निदान वैद्याकीय विमा तरी अधिकाधिक लोकप्रिय कसा होईल यासाठी प्रयत्नांची गरज असताना या विम्याच्या वार्षिक वर्गणीवर १८ टक्के इतका सणसणीत कर आपल्याकडे आकारला जातो. त्याची वसुली केली जाते अर्थातच विमा खरेदी करणाऱ्या ग्राहकांकडून. म्हणजे दंडावर भुर्दंड म्हणायचा. अशावेळी किमानपक्षी वैद्याकीय विम्यावरील वस्तू–सेवा कर रद्द अथवा कमीत कमी कसा आकारला जाईल हे पाहणे अर्थमंत्र्यांचे कर्तव्य होते. पण बकासुराप्रमाणे महसुलासाठी बारा महिने चोवीस तास हपापलेले सरकार या आयत्या उत्पन्नावर कसे काय पाणी सोडणार? वैद्याकीय विम्यावर इतका वस्तू–सेवा कर आकारणे म्हणजे जगण्यातील अस्थैर्यालाच कराच्या जाळ्यात आणणे, असे ही कर हटवा मागणी करणारे म्हणतात. त्यात निश्चित तथ्य आहे. कर हा व्यक्तीच्या उत्पन्नावर असतो. म्हणजे एखाद्याने जी काही कमाई केली ती करपात्र असते वा नसते. पण जगण्यातील अस्थिरता ही काही कोणाची स्वकर्तृत्वाने केलेली कमाई नाही. एखादा स्वत:च्या बेजबाबदारपणामुळे स्वत:पुरती अस्थिरता ओढवून घेतो ती बाब वेगळी. पण हे विधान सरसकटपणे करता येत नाही. अशावेळी आयुष्यातील अस्थिरतेस काही स्थिर आधार देण्याचा प्रयत्न म्हणून एखाद्याने आयुर्विमा वा वैद्याकीय विमा काढला तर असे करणाऱ्यास खरे तर व्यवस्थेने प्रोत्साहन द्यायला हवे. कारण स्वत:ची व्यवस्था स्वत: करू शकणाऱ्या व्यक्तीमुळे सरकारची होणारी बचत ही अन्य गरजूंच्या मदतीसाठी वापरता येऊ शकते. म्हणजेच त्यांना यासाठी अधिक करसवलत द्यायला हवी. ते राहिले बाजूलाच. उलट असे करू पाहणाऱ्यांवर सरकार १८ टक्के इतके करभार आकारणार; यात कोणते शहाणपण? यास आणखी एक बाजू आहे. ती अशी की आयुर्विमा, वैद्याकीय विमा यांवर केलेला खर्च हा आयकर– मुक्त असे. ही सोय जुन्या आयकर प्रणालीत होती. तिचा फायदा घेण्यासाठी का असेना आयुर्विमादी बाबींत गुंतवणूक केली जात असे. तथापि नव्या कर प्रणालीत अशा सर्व सुविधा काढून घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे कर वाचवण्यासाठी गुंतवणूक करण्याची काही सोयच मध्यमवर्गीयांस राहिलेली नाही. अशावेळी विमा कर्मचाऱ्यांची संघटना कर वाढीविरोधात आवाज उठवून ही करसवलत पुन्हा द्या अशी मागणी करत असेल तर ती अत्यंत स्तुत्यच ठरते. आणि अशा मागणीस नितीन गडकरी हे पाठिंबा देत असतील तर तो अधिकच लक्षणीय ठरतो. या 'अधिकच'चे कारण हे अर्थकारणात नाही. राजकारणात आहे. ही करवाढ केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे आणि त्याच केंद्र सरकारात नितीन गडकरी हे महत्त्वाच्या खात्याचे मंत्री आहेत. आपल्याच एका सहकारी मंत्र्याच्या खात्यासंदर्भातील मागणीस त्यांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. आणि ही घटना विद्यामान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ताज्या निवडणुकीत भाजपस अपेक्षित यश मिळवून देण्यात अपयश आल्यानंतर घडलेली आहे. ही यातील अत्यंत कळीची बाब. मोदी आपला 'चारसो पार'चा नारा खरा करू शकले असते तर 'एखादी व्यक्ती परमेश्वर होऊ शकत नाही' वगैरे विधाने ज्या प्रमाणे केली गेली, तशी ती कुणी केली असती किंवा काय असा प्रश्न उपस्थित होतो; त्या प्रमाणे स्वत: सहभागी असलेल्या सरकारच्या करप्रणाली विरोधातील मतास केंद्रीय मंत्र्यांकडूनच असा पाठिंबा मिळाला असता काय, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण करून क्रिमी लेअर लावण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय म्हणजे मागासवर्गीयांचे आरक्षण संपविण्याचे सुनियोजित षडयंत्र.

पंजाब राज्य विरूद्ध दविंदर सींग, सिव्हिल अपिल क्र.२३१७/२०११ संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधिशांच्या पिठाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यघटनेचा अभ्यास करणाऱ्यांसाठी अनाकलनीय असणारा निर्णय दिला आहे. असाच अनाकलनीय निर्णय सर्वोच्च न्यायालयाने ईडब्लुएस आरक्षणासंदर्भात यापूर्वी दिला आहे.या निर्णयाने याच सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी म्हणजेच २००४ साली ई.व्ही. चिन्नय्या वि आंध्रप्रदेश राज्य हा स्वतःच दिलेला पाच जज बेंच चा निर्णय रद्दबादल ठरविला आहे.

५६५ पानांच्या या निर्णयांमध्ये प्रत्येक न्यायाधिशाने आपला निर्णय देऊन प्रत्येकाने आपले मत स्वतंत्रपणे मांडले आहे.खरे तर हा निर्णय बहुमताच्या तत्वाने लिहीण्यात आला आहे.या प्रकरणात सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचुड व न्याय.मनोज शर्मा यांनी पान क्र .१ते १४० पर्यंत आपला संयुक्त निर्णय दिला आहे.अन्य न्यायाधीश न्या.भूषण गवई, न्याय.बेला त्रिवेदी,न्याय.पंकज मित्तल,न्याय. विक्रम नाथ यांनी स्वतंत्र निर्णय लिहिल्यानंतर शेवटी न्याय.सतिश चंद्र शर्मा यांनी कॉन्क्लुडिंग निर्णय लिहिला आहे. न्याय.बेला त्रिवेदी यांनी चिन्नय्या निर्णयानुसार वर्गिकरणास विरोध दर्शविला. अशाप्रकारे सहा विरूद्ध दोन अशा बहुमताचा हा निर्णय आहे.विशेष लक्षात येणारी बाब म्हणजे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची चिरफाड करीत असताना घटनाबाह्य ईडब्लुएस आरक्षणासंदर्भात मात्र ५६५ पानांच्या निर्णयात एकदाही उल्लेख नाही.

पंजाब राज्य विरूद्ध दवेंदर सींग हा निर्णय १९९२ साली सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ जज बेंच ने दिलेल्या निर्णयाशी साम्यता दर्शविणारा निर्णय आहे.तो यासाठी की तेव्हा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या पदोन्नतीचा मुद्दा नसताना व मुद्दा ओबीसी व आर्थिक आरक्षणाचा असताना तेव्हा पदोन्नती मधिल आरक्षण पाच वर्षांनंतर बंद करण्याचा निर्णय देण्यात आला.आता यावेळी एससी एसटी च्या वर्गिकरणाचा मुद्दा असताना त्यापुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व जमातींना क्रिमी लेअर लावण्याचा निर्णय देऊन आरक्षण फक्त एका पिढीपर्यंतच असण्याची बाब कुठलाही संविधानीक आधार नसताना एका न्यायाधिशाच्या निर्णयात बेमालूमपणे टाकण्यात आली.

आश्चर्यजनक व तेवढेच धक्कादायक म्हणजे एकाच जातीचे सहा न्यायाधीश असताना अनुसूचित जातीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या न्याय. भुषण गवई यांच्या नावावर सर्वाधिक पाने या निर्णयामध्ये आहेत.पान क्र.१४१ ते पान क्र.४२१ पर्यंत म्हणजेच ५६५ पानांमध्ये तब्बल २८० पाने न्याय.भुषण गवई यांचे नावावर आहेत. त्यांच्या निर्णयामध्ये एकुण २९७ परिच्छेद आहेत. ते वाचताना अंगावर काटा आल्याशिवाय रहात नाही. स्वतःच्या मतांच्या पुष्ट्यर्थ त्यांनी दिलेली उदाहरणे न पटणारी आहेत. काही ठिकाणी संस्कृत चा वापर केला आहे.त्यामुळे हा निर्णय त्यांनीच लिहिला काय? अशी शंका प्रत्येकाला येणे वाजवी आहे.

आता आपण निर्णयाचे विश्लेषण करू; तर मध्ये पान क्रमांक ५६५ वर न्याय. सतिश चंद्र शर्मा यांनी जो निर्णय दिला आहे तो असा आहे; १) (म्हणजेच,अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण करणे संविधानिक रित्या अनुज्ञेय आहे.) २) (म्हणजेच, क्रिमी लेअर ची ओळख करणे घटनात्मक दृष्ट्या अनिवार्य असले पाहिजे.) पान क्र. ५६२ वरील परिच्छेद ८४(४) मध्ये न्याय.पंकज मित्तल यांनी अतिशय खळबळजनक व आजपर्यंतच्या कुठल्याही निर्णयामध्ये न मांडल्या गेलेले मत मांडले आहे. ते म्हणतात; ८४( ३) (म्हणजेच,आरक्षण हे केवळ पहिल्या पिढीपर्यंत किंवा एकाच पिढीपर्यंत मर्यादित असायला पाहिजे.)

आता आपण या निकालाचा महत्वपूर्ण भाग असलेल्या २८० पानांच्या निकालाकडे वळू. म्हणजेच न्याय.भूषण गवई यांनी दिलेल्या निकालाकडे वळू. परिच्छेद २९६(७) (म्हणजेच, क्रिमी लेअर चे तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींनाही कायद्याच्या योग्य स्थितीनुसार लागू आहे.) परिच्छेद २९६( ७) (म्हणजेच,अनुसूचित जाती व जमातींना लागू होणारे क्रिमी लेअर चे निकष हे ओबीसी निकषांपेक्षा वेगळे असतील.) याचा सुचक अर्थ असाही होतो की निकष हे ओबीसी उत्पन्नापेक्षा कमी असतील जे एससी एसटी यांना शिष्यवृत्तीसाठीही आहेत.

न्याय.भूषण गवई यांनी क्रिमी लेअर चे समर्थन करताना दिलेले दाखले मोठे हास्यास्पद आहेत. ते म्हणतात; एखाद्या चपराशी असलेल्या व्यक्तीवर सामाजिक व शैक्षणिक भेदभाव होऊ शकतो. पण उच्च पदावर कार्यरत व्यक्तीवर सामाजिक भेदभाव होऊ शकत नाही. तो सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असू शकत नाही ( परिच्छेद २९४). सदर बाब ही पदोन्नती मधिल आरक्षण बंद करण्या संदर्भात असलेली म्हणता येईल. म्हणजेच ती अनुच्छेद १६(४अ) नाकारणारीही म्हणता येईल.

कदाचित असा निर्णय अपेक्षित असेल म्हणून जरनैल सींग विरूद्ध लक्ष्मी नारायण गुप्ता या पदोन्नती मधिल आरक्षणाच्या प्रकरणात २६.९.२०१८ व २८.१.२०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यावरही अजूनपर्यंत पिटीशन्स डिस्पोज ऑफ करण्यात आल्या नसाव्या अशी शंका व्यक्त होण्यास वाव आहे.या निकालामुळे आता पदोन्नती मधिल आरक्षणावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले हे नाकारून चालणार नाही.

न्याय.भूषण गवई म्हणतात;चिन्नय्या निर्णय कायद्याला धरून नाही.कारण तो केवळ काही गृप साठीच फायदेशीर आहे (परिच्छेद २९६–१).अनुसूचित जमातींमधिल वर्गीकरण हे कायद्यानुसार ज्यास्त फायद्याचे आहे. राज्याने आरक्षणाचे फायदे ज्यास्त कुणाला मिळाले हे प्रमाणित केले पाहिजे (परिच्छेद २९६–३). एम.नागराज,जरनैल सींग व या दवेंदर सींग निर्णयानुसार क्रिमी लेअर चे तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींनाही लागू होते. जे कायद्यानुसार योग्य आहे (परिच्छेद २९६–७). राज्यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींमधिल क्रिमी लेअर निश्चित करण्यासाठी धोरण तयार केले पाहिजे (परिच्छेद २९५).

एका अर्थाने सात जजेस बेंचचा हा निर्णय अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सरळसेवा भरती सह पदोन्नती मधिल आरक्षणावरही भयंकर आघात करणारा आहे. किंबहुना आरक्षणाची संकल्पनाच संपविणारा आहे.दुसऱ्या अर्थाने घटनेचे कलम १६(४) व १६(४अ) ची मुळ संरचनाच नष्ट करणारा आहे.किंबहुना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांनी वरच्या पदावर जाऊ नये याची तजवीज करणारा आहे. आणि उल्लेखनीय म्हणजे या निर्णयाचा आधार न्याय.भूषण गवई यांच्या मतप्रदर्शनानूसार दर्शविण्यात आला आहे. इतर न्यायाधिशांनी आम्ही न्याय.गवई यांच्या भूमिकेशी सहमत आहोत इतकेच म्हटले आहे. या निर्णयामुळे आता न्याय. भूषण गवई यांचा न्याय.संजीव खन्ना यांचे नंतर सरन्यायाधीश होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची चर्चा आहे.

या प्रकरणामध्ये केवळ वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के.एस.चौहान यांनीच वर्गीकरणास विरोध दर्शविणारी बाजू मांडली. त्यांचेमुळे मलाही फेब्रुवारी महिन्यात झालेला सर्वोच्च न्यायालयातील अंतिम युक्तिवाद ऐकण्याची संधी मिळाली. भारत सरकारतर्फे अटार्नी जनरल आर. वेंकटरमाणी व सॉलीसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडताना वर्गीकरण होण्यासाठी सरकारची बाजू जणू काही उतावीळ झाल्याप्रमाणे जोरकसपणे मांडली. त्यावरून निवडणूक जिंकण्यासाठी जातिय समिकरण जुळवून आणण्यासाठी सत्ताधारी पक्ष उतावीळ झाल्याचे दिसून येते. काही जातींना जाणिवपूर्वक आपल्याकडे वळविण्याचा हा प्रकार म्हणता येईल. कारण काही जातिंमध्ये जाणिवपूर्वक विशिष्ट जातीच आरक्षणाचा फायदा घेत आहेत असे बिंबवण्यात आले. खोलात जाऊन विचार केल्यास वर्गीकरणामुळे फायदा होण्यापेक्षा नुकसानच जास्त होणार आहे. आणि क्रिमी लेअर चा उदेश मागासवर्गीयांना उच्च पदावर जाण्यापासून रोखण्याचा आहे.



या निर्णयाची अफलातून बाब म्हणजे क्रिमी लेअर बाबत निर्णय देण्याची मागणी दवेंदर सींग प्रकरणात करण्यात आली नव्हती. त्याबाबतही स्वतंत्र प्रकरण समता आंदोलन समिती वि. भारत सरकार या नावाने सर्वोच्च न्यायालयात दाखल असून त्याचीही सुनावणी संविधान पिठासमोर सुरू आहे. मग वर्गीकरण संदर्भातील प्रकरणामध्येच क्रिमी लेअर चा निर्णय कां आला? हे एक कोडेच आहे.या निर्णयाबाबत स्वतंत्र मजदूर युनियनची टिम येत्या सोमवारी वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के.एस चौहान सर यांची सुप्रीम कोर्टात भेट घेणार आहे.त्याचप्रमाणे ५६५ पानांच्या या निर्णयाची सखोल माहिती मिळण्यासाठी व या निर्णयामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधित्वावर तसेच आरक्षणाच्या एकुण संकल्पनेवर होणाऱ्या परिणामांची अधिकारिक माहिती प्राप्त होण्यासाठी नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र येथे लवकरच चर्चा सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.

नरेंद्र जारोंडे– ९८५०१९२३२९,नागपूर.

( स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतर्फे पदोन्नती मधिल आरक्षणासंदर्भातील प्रकरणाचे याचिकाकर्ते)

# आमच्या जलमय झालेल्या वायनाडची गोष्ट हेच सांगते की

९ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी सहा वाजता, आमच्यापैकी एकाला (उन्नी) त्याच्या आईचा फोन आला की त्यांच्या पलक्कड येथील घराजवळ पूर येत आहे आणि कालपथी नदीला लागून असलेल्या कालव्यातील पाण्याची पातळी वेगाने वाढत आहे. त्या दिवशी नंतर, मलमपुझा धरणाचे शटर उघडण्यात आले, ज्यामुळे कालव्यातील पाण्याची पातळी आणखी वाढली. या पुरामुळे लोकांच्या गाड्या, इतर उपकरणे आणि फर्निचरचे नुकसान झालेच पण पावसाचा आनंद घेणेही तेव्हापासून संपले ते कायमचेच.२०१८ पासून दरवर्षी, अनेक केरळवासीयांना पाऊस जास्त पडतो आहे हे बघितले की मौल्यवान वस्तू वरच्या मजल्यावर हलवण्याची सवय लागली आहे. प्रत्येक पावसाळ्यात आजूबाजूच्या परिसरात सतत ही तयारी आणि चिंतेचे वातावरण असते. मंगळवारी सकाळी आणखी एक फोन कॉल आला, आवाजात भीतीची एक परिचित टीप होती घर पुन्हा जलमय झाले आहे. पावसाने आजवर केरळच्या लवचिकतेची वेळोवेळी चाचणी घेतली आहे. त्यामुळे इथे आता मान्सूनचे स्वागत मोठ्या सावधगिरीने आणि काळजीने केले जाते. दरवर्षी घरे, उपजीविकेची साधने गमावली जातात. शांतता आणि सुरक्षिततेची भावना तर केव्हाच हिरावून घेतली गेली आहे. २०१८ पासून, कोझिकोड, पलक्कड, वायनाड आणि मलप्पुरम जिल्ह्यात पाच गंभीर भूस्खलन झाले आहेत ज्यात एकूण १६० लोकांचा मृत्यू झाला आहे. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, केरळमध्ये २०१५ ते २०२२ दरम्यान सर्वाधिक भूस्खलनाचा सामना करावा लागला. देशात झालेल्या ३,७८२ भूस्खलनांपैकी २,२३९ भूस्खलने एकट्या केरळमध्ये नोंदवली गेली आहेत. वायनाडमध्ये नुकत्याच झालेल्या भूस्खलनामध्ये मडिकाई आणि चूरलमाला ही दोन गावे पूर्णपणे वाहून गेली आहेत. या गावांमध्ये प्रत्येकी अंदाजे हजार लोकांची वस्ती होती. इथे अजूनही पाऊस कमी झालेला नाही आणि बचाव आणि मदत कार्यात अडथळे येत आहेत केरळच्या वार्षिक भूस्खलनाच्या समस्येवर माधव गाडगीळ समिती (२०११) आणि के. कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय कार्यगटाच्या (२०१३) अहवालांनी आणि तसेच त्यांच्या शिफारशींना झालेल्या विरोधाने पुन्हा प्रकाश टाकला आहे. भूस्खलनामुळे उद्ध्वस्त झालेले



वायनाडचे क्षेत्र हे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून ओळखले जावे अशी शिफारस गाडगीळ समितीने केली होती. या क्षेत्रांना त्यांच्या पर्यावरणीय नाजूकतेच्या आधारावर तीन श्रेणींमध्ये वर्गीकृत करण्यात आले. खाणकाम, उत्खनन, प्रदूषणकारी कारखाने इत्यादींवर बंदी यांसह बांधकाम आणि विकासकामांवर अनेक निर्बंध घालण्याचे प्रस्तावित होते. गाडगीळ समितीच्या अहवालानुसार, पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र–१ मध्ये, कोणतीही वनजमीन बदलता येणार नाही. बिगर वने ही जमिनीत तसेच शेतजमीन ही बिगरशेती जमिनीत बदलता येणार नाही. अहवालात असेही म्हटले आहे की केरळच्या वायनाड जिल्ह्यातील सुलतान बथेरी, वैयत्तीरी आणि मनंतवाडी हे विशेषत: असुरक्षित आहेत आणि म्हणून त्यांना पर्यावरणीय संवेदनशीलतेच्या सर्वोच्च श्रेणीमध्ये ठेवण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, मलप्पुरममधील पेरिंथलमन्ना आणि तिरूर तालुक्यांना पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र–२ श्रेणीमध्ये ठेवायचे होते. कोणत्याही संवर्धनाच्या प्रयत्नात स्थानिक समुदायांना सामील करून घेण्याचे आणि त्यांच्या उपजीविकेवर या धोरणांमुळे विपरित परिणाम होणार नाही याची खात्री करण्याचे महत्त्वही अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. तसेच या प्रदेशातील पर्यटन हे पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत राहण्यासाठी आणि त्या प्रदेशाच्या नाजूक पर्यावरणीय समतोलाला बाधा पोहोचवू नये यासाठी ते नियंत्रित केले जावे अशी शिफारसही या अहवालांमध्ये केली आहे.

भू–वापरात बदल करण्यास मनाई करण्याच्या शिफारशीला डोंगराळ प्रदेशातील काही शेतकऱ्यांनी विरोध केला. २०१३ मध्ये केरळ आणि दक्षिणेकडील इतर राज्यांमध्ये राजकीय पातळीवर या अहवालांविरोधात निदर्शने झाली. संबंधितांशी चर्चा न करताच हे अहवाल जनतेवर लादले गेले असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे होते. ही आंदोलने खाण माफियांनीच घडवून आणली होती, असेही आरोप केले गेले. शेतकऱ्यांना घराबाहेर काढण्याची धमकी दिली गेली. गाडगीळ आणि कस्तुरीरंगन समितीचे दोन्ही अहवाल हे पर्यावरणादृष्ट्या अति टोकाचे आणि पुरेसे लोककेंद्रित नसल्याची टीकाही विविध विभागांकडून करण्यात आली होती. सर्व पातळींवरून आलेल्या सार्वजनिक दबावामुळे सरकारला या अहवालांत सुचवल्या उपाययोजना करता आल्या नाहीत.

नैसर्गिक आपत्तीबाबत फक्त ती आपत्ती हीच तेवढी नैसर्गिक गोष्ट असते, असे म्हटले जाते. त्या आपत्तीला कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत, याची अगदी प्रत्येक टप्प्यावर कारणमीमांसा करता येते. त्याच्या परिणामी वायनाडमधून आज हृदय पिळवटून टाकणाऱ्या कहाण्या ऐकू येत आहेत. नुसती पुनर्बांधणी नाही तर अधिक चांगली उभारण्याची वेळ आली आहे. लोकांना फक्त सध्याच्या आपत्तीतून नाही, तर भविष्यात अशा सर्व शोकांतिकांपासून वाचवणे आवश्यक आहे.

त्याच वेळी, वायनाडची गोष्ट आपल्याला हे सांगते की पर्यावरण संवर्धन हा वर कोणीतरी ठरवले आणि खालच्या लोकांना आज्ञा दिल्या अशी पद्धतीने करायचा प्रयत्न असू शकत नाही. संवर्धन प्रक्रियेत लोकांचा पाठिंबा आणि सहभाग आवश्यक आहे. याचा अर्थ पर्यावरण विरुद्ध विकास या द्वंद्वावर मात करण्यासाठी धोरणांच्या पातळीवरही प्रयत्न केले पाहिजेत. येत्या काही वर्षांमध्ये हवामान बदलांशी संबंधित अशा आणखीही तीव्र आपत्ती केरळसारख्या आपत्ती–प्रवण राज्यांमध्ये घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांच्या गरजा आणि त्यांची उपजीविकेची साधने यांचा विचार करणारे पायाभूत सुविधा प्रकल्प असावेत, तशी राजकीय इच्छाशक्ती असावी आणि तशी पर्यावरणविषयक धोरणे असावीत एवढीच अपेक्षा आहे.

# ऑगस्ट महिन्यासाठी मालमत्ता करात ५% सुट

लातूर/प्रतिनिधी : – कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच १००% कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून कर संकलन केले जात आहे. त्यादृष्टीने नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी वर्षाच्या सुरुवातीस विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर `पश्रळपश भरणा–यास १० % व ऑफलाइन भरणाऱ्यास ७% सवलत देण्यात आली होती. सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल १५००० हून अधिक मालमत्ता धारकानी १८ कोटी येवढा टॅक्स भरणा केला आहे. सदरील योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता २ वेळा मुदतवाढ सुद्धा देण्यात आली होती.

आता ऑगस्ट महिन्या साठी सूट मधे कपात होऊन सामान्य करात ५% सुट योजना लागू करण्यात आली आहे. टॅक्स ऑनलाइन पधतीने भरणा केल्यास अतिरिक्त ३% सुट लागू राहणार आहे. तसेच महिला, दिव्यांग, स्वातंत्रसैनिक, रेन वॉटर हार्वेस्टिंग व सोलर सिस्टम बसविणे, चार्जिंग स्टेशन उभारन्यास नियमांनुसार सुट लागू राहिल. तसेच ऑगस्ट महिना सुट/सवलतीचा शेवटचा महिना असल्याने उर्वरित मालमत्ता धारकणी सुट चा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा व शहर विकासात हातभार लावावा असे आव्हान मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे. कर भरणा करण्यासाठी सिटीझन अॅप किंवा या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# वैद्यकीय–अभियांत्रिकी करियर करू इच्छिणाऱ्या मुलांना आकाश क्लासेस देणार मदतीचा हात–शाखा व्यवस्थापक पांडुरंग कळकेकर




लातूर: – लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवर असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडतर्फे (आकाश क्लासेस) राष्ट्रीय पातळीवरील अँथे शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येत असून, त्याद्वारे वैद्यकीय–अभियांत्रिकीत करिअर करू इच्छिणाऱ्या मुलांना मदतीचा हात दिला जाणार आहे. असल्याचे आकाश क्लासेसचे पांडुरंग कळकेकर यांनी आज दिनांक २ जुलै रोजी दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. सातवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येईल. पाच विद्यार्थ्यांना अमेरिकेतील केनेडी स्पेस सेंटरमध्ये मोफत सहल,१५० सर्वोत्कृष्ट ५० विद्यार्थ्यांना रोख पुरस्कार आणि अन्य लाभ दिले जाणार आहेत. १९ ते २७ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने परीक्षा होणार आहे. शंभर टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती उपलब्ध असणार आहे. गतवष देशभरातून ११.८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. नोंदणी विद्याथ किंवा पालकाना ... वर ऑनलाइन किंवा आकाशच्या केंद्रात करता येईल. आकाशकडून १५ वर्षांपासून ही परीक्षा घेतली जात आहे. ही शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना आकाशच्या विस्तृत कोचिंग प्रोग्रामचा फायदा होतो. याद्वारे विद्यार्थ्यांना नीट, जेईई, राज्य सीईटीसह एनटीएसई, ऑलिम्पियाडसारख्या विविध परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते. परिणामी असंख्य विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि क्षमतांमधील अंतर भरुन काढण्यात अँथे महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. डॉक्टर, अभियंते घडवण्यासाठी आणि डॉ. अब्दुल कलाम, स्वामीनाथन आदींसारख्या प्रतिभांचा शोध घेण्यासाठी ही परीक्षा असून, त्यातून आपली तरुणाई विज्ञान, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अग्रगण्य कार्य करत भारताचा जगात गौरव करतील, अशी अपेक्षा आकाश क्लासेसची आहे. भारतातील २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ही परीक्षा होणार आहे. उत्कृष्ट विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंतच्या शिष्यवृत्ती व्यतिरिक्त रोख पुरस्कार देखील मिळतील. अशाही शाखा व्यवस्थापक पांडुरंग कळकेकर यांनी बोलताना सांगितले.


यावेळी अकॅडमी डायरेक्टर दीपक सिक्रोरिया म्हणाले की आकाश संस्थेच्या देशभरातील ३९५ हून अधिक केंद्रांवर २० आणि २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत ऑफलाइन तर ऑनलाइन परीक्षा १९ ते २७ ऑक्टोबर २०२४ ऑनलाईन परीक्षा होणार आहे. ही एक तासाची चाचणी असेल. ज्यामध्ये एकूण ९० गुण असतील. विद्यार्थ्यांच्या ग्रेड, कलवर आधारित ४० एमसीक्यू पद्धतीचे प्रश्न असतील. परीक्षेसाठी नावनोंदणी करण्याची अंतिम तारीख ऑनलाइन परीक्षा सुरू होण्याच्या तीन दिवस आधी आणि ऑफलाइन परीक्षेच्या सात दिवस आधी आहे. ऑफलाइन आणि ऑनलाइन परीक्षेसाठी २०० रुपये परीक्षा शुल्क आहे. १५ ऑगस्टपूव नोंदणी केल्यास नोंदणी शुल्कात ५० टक्के सवलत मिळेल. असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या पत्रकार परिषदेला अकॅडेमिक डायरेक्टर श्री दीपक सिक्रोरिया, शाखा व्यवस्थापक श्री पांडुरंग कळकेकर, अकॅडेमिक हेड मेडिकल श्री क्षितिज जैन, अकॅडेमिक हेड इंजिनीरिंग श्री जितेंद्र सिंग चरण, अकॅडेमिक हेड फौंडेशन श्री संजय पोल, उप शाखा व्यवस्थापक (ऑप्स) दिग्विजय कांबळे, उप शाखा व्यवस्थापक (सेल्स) बळीराम पवार आदींची उपस्थिती होती.

# हृदयाच्या आरोग्याकडे करू दुर्लक्ष नका

वेळीच उपचार न केल्यास हृदयविकारामुळे हार्ट फेल्युअर, हृदयविकाराचा झटका, पक्षाघाताची समस्या उद्भवू शकते; ज्यामुळे मृत्यू ओढावतो. हृदयविकाराशी झुंजणार्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी वेळीच उपचार करणे गरजेचे असते.

हृदयविकारामध्ये हृदयाच्या आरोग्याशी संबंधित अनेक परिस्थितींचा समावेश होतो, ज्याचा परिणाम एखाद्याच्या संपूर्ण आरोग्यावर होऊ शकतो. हृदयरोगामध्ये हृदयाच्या संरचनेवर आणि कार्यावर परिणाम करणार्या सामान्य प्रकारांपैकी एक म्हणजे कोरोनरी आर्टरी डिसीज. ज्यामध्ये धमन्यांमध्ये प्लेक तयार होतो, जो हृदयाला रक्त प्रवाहात अडथळा निर्माण झाल्यावर दिसून येतो. यामुळे छातीत दुखणे, हृदयविकाराचा झटका येणे आणि वेळीच उपचार न केल्यास मृत्यूदेखील ओढवू शकतो. कार्डिओमायोपॅथी म्हणजे जेव्हा हृदयाचे स्नायू प्रसरण पावतात किंवा कमकुवत होतात आणि आवश्यकतेनुसार रक्त पंप करण्यात अयशस्वी ठरतात. एरिथमिया म्हणजे अनियमित हृदयाचा ठोका, जो हृदयाच्या पंपिंगमध्ये व्यत्यय आणतो. हा अचानक चक्कर येणे किंवा हृदयविकार यासारख्या गुंतागुंतीस कारणीभूत ठरतो. डॉक्टरांना वेळीच लक्षणे समजल्यास त्वरित वैद्यकीय मदत मिळू शकते. तथापि, हृदयविकारावर योग्यवेळी उपचार न केल्यास गंभीर गुंतागुंत होऊ शकते, ज्यामध्ये एखाद्याचे प्राणही जाऊ शकतात.

हृदयरोगासंबंधित घातक गुंतागुंत



हृदयविकाराचा झटका किंवा सडन कार्डीयाक अरेस्ट : वेळीच उपचार न केलेल्या हृदयविकारामुळे गंभीर गुंतागुंत निर्माण होतात. म्हणूनच विलंब न करता त्वरीत वैद्यकिय मदत घेणे गरजेचे आहे.

हार्ट फेल्युअर : कार्डिओमायोपॅथीमुळे त्वरीत उपचार न केल्यास हार्ट फेल्युअरसारखी गुंतागुंत होऊ शकते. वेळीच उपचार न केल्यास अरिथमियासारखी हृदयविकारासंबंधित गुंतागुंत निर्माण होते आणि यामुळे हृदयाची असामान्य लय, स्ट्रोक किंवा सडन कार्डियाक अरेस्ट सारख्या समस्या उद्भवू शकतात.

कार्डियाक अरेस्ट : एरिथमियामुळे हृदयाचा झटका आणि मृत्यूची शक्यता वाढते. चक्कर येणे, धाप लागणे, थकवा येणे, हृदय धडधडणे आणि मळमळणे ही हृदयविकाराची लक्षणे आहेत.

भावनिक आणि शारीरिक प्रभाव : जर एखाद्याला हृदयविकार असेल आणि त्यावर वेळीच उपचार न केल्यास उदासीनता, चिंताग्रस्त होणे आणि तणावाचा सामना कराला लागू शकतो. नियमित आरोग्य तपासणी करणे, पौष्टिक आहार घेणे, व्यायाम करणे, तणावाचे व्यवस्थापन करणे आणि डॉक्टरांनी दिलेल्या उपचार योजनेचे पालन केल्याने गुंतागुंत टाळणे आणि जीवनाचा दर्जा सुधारणे शक्य आहे. म्हणून हृदयाच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्येचे निदान करण्यासाठी नियमित हृदय तपासणी करणे आवश्यक आहे.

# उच्च रक्तदाबाच्या सकाळी जाणवणाऱ्या ‘या’ पाच लक्षणांकडे चुकूनही करू नका दुर्लक्ष; जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात.

उच्च रक्तदाबाला ‘सायलेंट किलर’, असे म्हटले जाते. कारण– उच्च रक्तदाब हा आरोग्यासाठी धोकादायक मानला जातो. पण, तुम्हाला माहीत आहे का की, सकाळचा तुमचा रक्तदाब कसा आहे यावरून तुम्ही तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आरोग्याविषयी जाणून घेऊ शकता.

परळ येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलचे वरिष्ठ सल्लागार व इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. समीर व्ही. पगड यांनी ‘दी इंडियन एक्स्प्रेस’शी संवाद साधला. त्यामध्ये त्यांनी सकाळच्या रक्तदाबाचे महत्त्व सांगितले आणि त्यावरून आपल्याला काही गंभीर संकेत मिळतात. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करू नका, असे सांगितले. डॉ. समीर व्ही. पगड सांगतात, दिवसभर आपल्याला रक्तदाबात चढ–उतार दिसून येतो. विशेषत: सकाळी रक्तदाब वाढतो. सकाळी उच्च रक्तदाब दिसून येणे, हे चिंतेचे कारण असू शकते. डॉ. पगड सांगतात, रक्तदाब हा ताण हार्मोन, झोपेचा अभाव इत्यादी गोष्टींमुळे वाढू शकतो. रक्तदाब कधीतरी वाढणे हे सामान्य असले तरी सतत उच्च रक्तदाबाची समस्या जाणवत असेल, तर आपण चुकीची जीवनशैली अंगीकारली असल्याचा तो संकेत आहे; ज्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यात अडथळा निर्माण होतो. खालील लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका उच्च रक्तदाबाची लक्षणे सहसा दिसत नाहीत. त्यामुळे आरोग्याकडे बारकाईने लक्ष देणे महत्त्वाचे आहे. सकाळी डोकेदुखी जाणवणे : उच्च रक्तदाबामुळे तुमच्या रक्तवाहिन्यांवर ताण येऊ शकतो आणि त्यामुळे डोकेदुखी जाणवू शकते.



नाकातून रक्तस्राव : उच्च रक्तदाबामुळे तुमच्या नाकातील रक्तवाहिन्या फुटू शकतात. असे घडल्यास नाकातून अचानक रक्तस्राव सुरू होतो. सतत थकवा जाणवणे : सकाळी तुम्हाला थकवा जाणवत असेल, तर हे शरीराच्या ऊर्जेवर परिणाम करणारे उच्च रक्तदाबाचे लक्षण असू शकते. अस्वस्थता जाणवणे : सकाळी आरामदायी न वाटणे किंवा अस्वस्थ वाटणे याचा थेट संबंध उच्च रक्तदाबाशी असू शकतो चक्कर येणे : उच्च रक्तदाबामुळे सकाळी उठल्यानंतर चक्कर येऊ शकते. वरील लक्षणे लक्षात घेऊन, तुम्ही उच्च रक्तदाब नियंत्रणात आणू शकता. नियमित तपासणी करा आणि डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या. रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी आणि हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा धोका कमी करण्यासाठी हे अत्यंत गरजेचे आहे.

# रात्रभर एसी लावून झोपता का? महिलेबरोबर काय झालं पाहा; डॉक्टरांनी सांगितल्या आरोग्याच्या गंभीर समस्या

उन्हाळा सुरू होताच बहुतेक लोक त्यांचे एसी सुरू करतात. कडक ऊन सुरू झाले की, अनेकांच्या घरात दिवसभर आणि रात्रभर एसी सुरू असतात. मात्र, काही घरांमध्ये १२ महिने एसी सुरू असतो, तर अनेक जण रात्री एसी सुरू ठेवूनच झोपून जातात. तुर्कीतील अंतल्या येथे रात्रभर एसी लावून झोपणे एका महिलेला महागात पडले आहे. २४ वर्षीय लियाना फॉस्टर रात्रभर एसीमध्ये झोपली होती आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ती उठली तेव्हा तिला अशक्तपणा आणि टॉन्सिलवर पांढरे डाग दिसले. रात्रभर एसी चालू ठेवून झोपल्याने तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. दिल्लीच्या सी. के. बिर्ला हॉस्पिटलच्या डायरेक्टर डॉ. मनीषा अरोरा यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. मनीषा अरोरा यांच्या मते, एसीमध्ये झोपल्याने तुमच्या शरीरावर अनेक परिणाम होऊ शकतात. जेव्हा तुम्ही एसीमध्ये झोपता तेव्हा खोलीचे तापमान रात्री इतके कमी होते की, तुमच्या शरीराला अस्वस्थ वाटू शकते. अधिक काळ एसी लावून झोपल्यामुळे डोकेदुखी आणि पाठदुखीची समस्या जाणवते. एसीमुळे निर्माण होणारी थंड हवा त्वचेतील ओलावा काढून टाकू शकते, ज्यामुळे कोरडेपणा येतो. कमी आर्द्रता आणि प्रसारित हवेमुळे श्वासोच्छ्वासाच्या समस्यांचा धोका वाढतो. त्याशिवाय एअर कंडिशनरमुळे पर्यावरणाची हानी होते. ते भरपूर ऊर्जादेखील वापरते; ज्यामुळे हवामानावर अतिरिक्त भार पडतो. एअर कंडिशनरमधील हायड्रोफ्लुरोकार्बन या वायूमुळे पर्यावरणाला हानी पोहोचते.

श्वसनाच्या समस्या वाढू शकतात डॉ. अरोरा म्हणाल्या, एसीमुळे दमा, सीओपीडी व ब्राँकायटिस यांसारख्या श्वसनाच्या समस्यादेखील वाढू शकतात. संधिवाताच्या रुग्णांमध्ये यामुळे स्नायू कडक होणे आणि सांधेदुखी यांसारखे त्रास बळावू शकतात. त्याव्यतिरिक्त एसी युनिट नियमितपणे साफ न केल्यास एसीमधली धूळ आणि बुरशीमुळे संवेदनशील व्यक्तींची ॲलर्जी वाढू शकते. सर्वसाधारण व्यक्तींच्या बाबतीत संक्रमण आणि ॲलर्जीचा धोका वाढू शकतो. रात्रभर एसीमध्ये झोपल्यानंतर सकाळी एखाद्याला जडपणा, डोकेदुखी, मळमळ व थकवा जाणवू शकतो. पुढे डॉ. अरोरा यांनी स्पष्ट केले की, हे कधी कधी हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या समस्या वाढवू शकते; विशेषत: वृद्ध लोकांमध्ये किंवा लहान मुलांमध्ये.

एसी असलेल्या खोलीत तुम्ही किती वेळ घालवावा? एसी असलेल्या खोलीत घालवलेला वेळ मर्यादित करण्याची शिफारस केली जाते. तापमान खूप जास्त नसून मध्यम पातळीवर ठेवावे, असे डॉ. अरोरा म्हणाले. सोबतच आपण पर्यावरणावरील परिणामाचाही विचार केला पाहिजे. कारण– एसीचा वापर वाढल्याने विजेचा जास्त वापर होतो आणि त्यामुळे अधिक प्रमाणात हायड्रोफ्लुरोकार्बन वायू बाहेर पडतो आणि हवामान बदलात भर पडते. त्यामुळे त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी नियमित विश्रांती घेण्याचा आणि नैसर्गिक हवा व तापमानात राहण्याचा सल्ला दिला जातो. एसी असलेल्या खोलीत दोन ते तीन तास घालवणे पुरेसे आहे. रात्री तुम्ही दोन ते तीन तासांनंतर एसी स्वयंचलितपणे बंद होण्यासाठी सेट करू शकता. २२ ते २६ अंश सेल्सिअससारखे आरामदायक तापमान राखले पाहिजे. एसीमध्ये फिल्टर वापरल्याने धूळ आणि ॲलर्जी कमी होण्यास मदत होऊ शकते.

# डेंग्यूपासून आराम मिळवायचांय? मग, औषधांसोबत आहारही महत्वाचा.! ’हे’ खाद्यपदार्थ ठरतील उपयुक्त

पावसाळा सुरू झाला की, आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे डेंग्यू, टायफॉईड इत्यादी आजारांचे आहे. सध्या देशभरात डेंग्यूच्या रूग्णांमध्ये झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. या दिवसांमध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे, डेंग्यूच्या डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. मादी एडिस डास हे डेंग्यूच्या विषाणूचे वाहक आहेत. या डासाच्या चाव्यामुळे व्यक्तीला डेंग्यूची लागण होते. डेंग्यूमुळे शरीरातील प्लेटलेट्स झपाट्याने कमी होऊ लागतात. शिवाय, अशक्तपणा मोठ्या प्रमाणात येतो. जर यावर वेळीच उपचार नाही केले, तर व्यक्तीला जीव देखील गमवावा लागतो. अशा परिस्थितीमध्ये डेंग्यूच्या उपचारांदरम्यान, रूग्णाने आहाराची देखील खास काळजी घेणे गरजेचे आहे. जर तुम्ही व्यवस्थित आहार घेतला तर तुमची डेंग्यूमधून लवकर सुटका होऊ शकेल. अशा परिस्थितीमध्ये तुम्ही औषधांसह काही फळे आणि भाज्यांचा आहारात समावेश केल्यास रूग्णाला बरे होण्यास मदत होते. किवी किवी हे फळ आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. ताप दूर करण्यासाठी किवीचे अवश्य सेवन करावे. व्हिटॅमिन सी आणि पोटॅशिअमने समृद्ध असलेल्या किवीचे सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. ज्यामुळे, संक्रमणाशी लढण्यास व्यक्तीला पुरेशी ऊर्जा मिळते. या व्यतिरिक्त किवी हे फळ शरीरातील इलेक्ट्रॉलाईट्सचे संतुलन राखण्यास मदत करते. त्यामुळे, डेंग्यूपासून लवकर आराम मिळवण्यासाठी किवीचा आहारात जरूर समावेश करावा.पालक पालकमध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि के इत्यादी जीवनसत्वांचे विपुल प्रमाण आढळते. ही सर्व जीवनसत्वे आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. या व्यतिरिक्त पालकमध्ये लोह देखील आढळते.

# अण्णाभाऊंचे साहित्य समाजाला दिशादर्शक....! – पूज्य.भंते पय्यानंद थेरो

लातूर : – लोकशाहीर,साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती प्रभाग क्र.चार येथील लुंबिनी नगर लातूर येथे संपन्न झाली.या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना पूज्य.भंते पय्यानंद थेरो म्हणाले, जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मज भीमराव ...! अशा पद्धतीने आपल्या शाहिरीतून समाज बांधवांमध्ये परिवर्तन करण्यासाठी ,साहित्यातील लेखणीच्या माध्यमातून प्रयत्न केले. सर्वांगीण विकासासाठी अण्णाभाऊ यांचे साहित्य प्रेरणा देणारे होते. म्हणून शिक्षण शिकल्याशिवाय समाजाची प्रगती नाही. समाजाने शिक्षण घेतले पाहिजे. अण्णाभाऊंना डोक्यावर न घेता, डोक्यात घ्या तरच समाजाची प्रगती होईल. धर्माच्या ठेकेदारांना 'मुक्ता साळवे' यांनी प्रश्न केला, प्रस्थापितांच्या विरोधात त्यांनी खूप मोठे काम केले. म्हणून महापुरुषांचे विचार लोक कल्याणकारी आहेत.समाज बांधवांनी असमानतेची भावना न ठेवता सर्वांना एकीने





राहून शिक्षण शिकून प्रगती साधली पाहिजे .

याप्रसंगी पूज्य. भंते बुद्धशील,सातकर्णी महाविहार,लातूर, डी .एस. नर्सिंगे सर (राज्याध्यक्ष– सत्यशोधक समाज महासंघ ) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

ध्वजारोहन ज्येष्ट नागरीक आयु.बाबुराव मोटे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिल मोटे,बबलू टेंकाळे,संजय कांबळे,रणजित कांबळे,वामन बनसोडे,विशाल बनसोडे,भागवत अहिरे, यांचे सह अनेकांनी परिश्रम घेतले.

छायाबाई मोटे,विमलबाई टेंकाळे,सुदामती कांबळे, छायाबाई कांबळे यांचेसह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्राचार्य डॉ.अरुण कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय गायकवाड (ता. अध्यक्ष, रि.पा.ई.) यांनी केले.

# बजरंग कांबळे यांचे निधन...



निलंगा :– मौजे सावणगिरा ता. निलंगा जिल्हा लातूर येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामजिक कार्यकर्ते बजरंग गोविंद कांबळे (वय ७५) वर्षे यांचे वृद्धापकाळाने दीर्घ आजाराने दि.०२ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी ०७ वाजेच्या सुमारास उपचार घेत असताना उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.०२ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ०३:३० वाजेच्या सुमारास सावणगिरा येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गाव परिसरातून अनेक मान्यवर उपस्थित होते त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले , एक मुलगी,सूना नातवंडे असा परिवार आहे.

# अरविंद खोपे विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी दोघांना अटक ; वस्तीगृहचालक व संस्थाचालकांवर गुन्हा नोंदवावा, फिर्यादीची पुरवणी जवाबात मागणी.

### संस्थाचालकांच्या अटकेसाठी दलित संघटना आक्रमक.

लातूर : लातूर शहरातील एमआयडीसी भागात असणाऱ्या विवेकानंद शैक्षणिक संकुलाच्या वसतिगृहात झालेल्या संशयास्पद अरविंद खोपे या विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी वसतिगृहातील दोघांवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा व अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, बुधवारी (दि.३१) इन कॅमेरा शवविच्छेदन झाल्यानंतर डॉक्टरांनी पोलिसांकडे अहवाल दिला असून,प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. मयत अरविंद राजेभाऊ खोपे (वय १३, रा. पांगरी, ता. परळी, जि. बीड) हा विद्यार्थी वसतिगृहात राहत होता. सोमवारी रात्रीच्या सुमारास वसतिगृहाच्या शौचालयात त्याचा संशयास्पद मृत्यू झाला होता.मयताच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरुन वसतिगृहातील टेंकाळे व सूर्यवंशी या कर्मचाऱ्यां विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा व अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून,त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.परंतु वसतीगृहचालक व संस्थाचालक यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी फिर्यादी कडून पुरवणी जवाबात करण्यात आली आहे.संस्थाचालकाच्या अटकेसाठी दलित संघटना आक्रमक होत आहेत. सदरील संस्थेचे संस्थाचालक अजित पाटील कव्हेकर हे भाजपचे माजी नगरसेवक आहेत त्या कारणाने सदरील प्रकरणाला राजकीय वळण मिळाले आहे.प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे करत आहेत.

# विविध मागण्यांसाठी निलंगा वकील संघाचे लाक्षणिक उपोषण...

निलंगा / प्रतिनिधी :– मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या अनेक विविध मागण्यांसाठी निलंगा वकील संघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले. लाक्षणिक उपोषणाच्या माध्यमातून निलंगा वकील संघाकडून केलेल्या मागण्या खालील प्रमाणे आहेत त्यात प्रामुख्याने न्यायालयाची जुनी इमारत पाडून आहे त्याच ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करून मिळणे,दुय्यम निबंधक कार्यालय निलंगा हे शासकीय कार्यालय मागील अनेक वर्षापासून खाजगी इमारतीमध्ये भाड्याने चालू असून ते दूर असल्याकारणाने गैरसोयीचे आहे. त्यामुळे सदरील कार्यालय हे मंजूर झालेल्या जागेवर स्थलांतरित करण्यात यावे. निलंगा दुय्यम निबंधक कार्यालयाचे दुय्यम निबंधक अशोक शिंदे यांची बदली होऊन त्यांचा कार्यकाळ संपलेला आहे तरीही त्यांचे बेकायदेशीर रित्या शासकीय कामकाज चालू आहे.त्यांची तत्काळ बदली करण्यात यावी. कोर्ट डिक्रीप्रमाणे होत नसून तलाठी फेर घेण्यास नकार देत आहेत.हे गरीब शेतकरी,नागरिकांना परवडणारे नाही त्यामुळे कोर्ट डिक्री प्रमाणे फेर घेण्याचे आदेश देण्यात यावे इत्यादी मागण्यासाठी उपोषण करण्यात आले.



अशोकराव पाटील–निलंगेकर यांनी दिला पाठींबा.. निलंगा वकील संघाकडून सुरू असलेल्या लाक्षणिक उपोषणास काँग्रेस नेते अशोकराव पाटील–निलंगेकर यांनी पाठिंबा देऊन वकील संघाच्या अडचणी सोडवण्याची ग्वाही दिली. यावेळी .. यावेळी वकील बार असोसिएशनचे ड.चंद्रकांत भोसले,ड.एस.व्ही.कुरले,ड.डी.एन.पाटील,ड.एस.एम.मातोळे,ड.बी.आर.सोमवंशी,ड.दाताळ,ड.तिरुपती शिंदे,ड.मोरे पाटील,ड.व्ही.बी.क्षीरसागर,ड.प्रवीण भोसले,ड.हर्षवर्धन धुमाळ,ड.बंडप्पा कोकणे,ड.उमेश जाधव,ड.बळीराम जाधव,ड.वासुदेव जाधव,ड.गजानन मंठाळे,ड.अमोल धैर्य,ड.सुलक्षण धैर्य,ड.दत्ता जाधव,ड.हेमंत गायकवाड,ड.यु.एस.जाधव,ड.पौळ,ड.व्ही.एस.शिंदे,ड.रामदास सुर्यवंशी,ड.किरण घाडगे,ड.दयानंद बिराजदार,ड.सलगर,ड.तानाजी पाटील,ड.डी.जी.मोरे,ड.एस.व्ही.मुळजे,ड.अमोल सगरे,तसेच समस्त वकील तज्ञ मंडळ उपस्थित होते.

# वकिलीच्या व्यवसायात नीतीमत्ता राखली पाहिजे._ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, २३ जुलै १९५० ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद सेशन्स कोर्टात भेट दिली तेव्हा वकिलीच्या व्यवसायात नीतीमत्ता राखली पाहिजे. असा संदेश दिला होता. त्या विधानाच्या ७४ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (–खछ– : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५८ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २८ जुलै २०२४ ला डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील प्रा. सुवार्ता राऊत म्हणाल्या की, आपण वकिली व्यवसायासह जीवनाच्या सर्व क्षेत्रात नैतिकता पाळली पाहिजे. उच्च न्यायालयात सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे तर सर्वोच्च न्यायालयात ६५ वर्षे असले तरी वकिलीच्या व्यवसायातील वकिलांना मात्र असे कुठलेही सेवानिवृत्तीचे बंधन नसते करिता बाबासाहेब आंबेडकरांनी नव तरूण वकिलांना संधी मिळावी म्हणून वयस्कर वकिलांनी स्वेच्छेने निवृत्ती घेतली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या उच्च कोटीच्या ज्ञानाच्या बळावर भारताचे संविधान लिहीत असताना लिंगाधारित स्त्री पुरुष असा भेदभाव न करता समान कामाला समान वेतनाची कामगार कायद्यात तरतूद केली तर महिलांसाठी प्रसुती रजा व मतदानाच्या अधिकाराची सुद्धा तरतूद केली. महिलांसाठी हिंदू कोड बिल लागू करण्यास विरोध झाल्याने २७ सप्टेंबर १९५१ ला मंत्रीपदाचा राजीनामा दिला. काय चांगले आणि काय वाईट याच्या आचरणातून नैतिकता ठरविली जाते. अनेक अपघात आणि हत्याकांड घडत असताना उपलब्ध जमाव बघ्यांची भूमिका घेत असतो, त्यांनी नैतिकता पाळली असे म्हणता येणार नाही.

याप्रसंगी महादेव डांबरे म्हणाले की, नीतीमत्तेची सुरूवात आपल्या घरापासून केली पाहिजे. जेणेकरून शून्यातून विश्व निर्माण करता येईल. अन्वर अलमनूर जाफर म्हणाले की, आपण पितृसत्ताक व्यवस्थेचे बळी ठरत आहोत. पुजा आणि वंदना यात फरक असतो. पुजा ही बंधनकारक असते तर वंदना ही बंधनकारक नसते. काय पाळायचे हे नैतिकता ठरविते. आंबेडकर हे अभिव्यक्तीपीठ असल्याने प्रत्येक घरी आंबेडकरवाद पेरणे आवश्यक आहे. करिता स्वयंपाक खोलीतून सुरूवात केली पाहिजे. एड. राजू बागूल म्हणाले की, नैतिकता पाळण्यासाठी अनेक घटक जबाबदार असतात. नैतिकता ही नैतिक असेलच असे नाही मात्र नैतिक असण्यासाठी नैतिकता पाळावीच लागते. करिता पक्षकारांनी सुद्धा नैतिकता पाळली पाहिजे. अनिल खिल्लारे म्हणाले की, कुशल कर्म करणे हीच नीतीमत्ता होय. सर्वांना परिक्षा बंधनकारक असली तरी न्यायधीश मात्र कोलेजियम पद्धतीने भरली जातात तेव्हा नैतिकता कुठे जाते? वकील मंडळीच समाजाची पुनर्रचना करू शकतात. एस. ओ. इंगळे म्हणाले की, न्यायालयात बहुतांश वेळा न्याय कमी वेळा दिला जातो तर निकाल जास्त वेळा दिला जातो. म्हणून शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये असे म्हणतात. लोकशाही आणि भारताचे संविधानाचा सरनामा पायदळी तुडविला जातो.

प्रमुख वक्ते एड. अरुण शेजवळ म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या व्यवसायात पाऊल ठेवले त्या काळात अस्पृश्य वकिलांकडे जाण्याची समाजाची मानसिकताच नव्हती. तरी ५ जून १९२३ ला नाशिक च्या जाधव यांची केस मिळाली. समाजाचा विज्ञानवादी दृष्टीकोन विकसित होणे भारताचे संविधानाला अपेक्षित आहे. वकील हा व्यक्ती पक्षकारांची बाजू मांडणारा मध्यस्थ असतो. केस हरली म्हणून नेहमीच वकील दोषी नसतो तर वकिलांना पक्षकारांनी काय पुराव्यासह माहिती उपलब्ध करून दिली हेच महत्वाचे असते. करिता विश्वासार्हतेने वास्तविकता स्विकारली पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो ज्यांनी स्टडी सर्कलच्या बातम्यां प्रकाशित केल्या आहेत. आजही समाजाचा वकिली व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोन तेवढा चांगला नाही. बडबड, कीचकीच, लबाडी करणारा व्यक्ती म्हणजे वकील होय. असे म्हटले जाते, पण हे तत्त्व सर्वांना सरसकट लावता येणार नाही. फार चांगले वकील सुद्धा समाजात उपलब्ध आहेत. त्यावरच समाजाची भिस्त उभी आहे. सदसद्विवेकबुद्धीला पटेल असे कृत्य करणे म्हणजे नैतिकता होय. समाजातील सर्व क्षेत्रातील लोकांनी तशी नीतीमत्ता, नैतिकता पाळली तर संरक्षण आणि न्यायालयाकडे जायची वेळच येणार नाही. स्वतःच्या समस्यांवर बोलताना न्यायधीशाची तर इतरांच्या समस्यांवर बोलताना वकिलांची भूमिका पार पाडणे म्हणजे, नीतिमत्ता नव्हे! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान आणि संविधान वादावर चर्चा करताना संवैधानिक नैतिकतेवर मार्गदर्शन केले आहे. ते आपण समजून घेतले पाहिजे. २३ जुलै १९५० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद सेशन्स कोर्टाला भेट दिली तेव्हा न्यायमूर्ती चंद्रकांत गोडसे यांनी स्वागत करून कोर्ट व बार असोसिएशन फिरून दाखविले होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी बोलताना आधुनिक मनू आहेत असे उदगार काढले होते. त्याप्रसंगी लायक वकील नसतील तर या खात्याची अधोगती होईल. तसेच या धंद्यात काहीही झाले तरी नीतीमत्ता राखली पाहिजे, असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. करिता प्रासंगिकता लक्षात घेऊन ७४ व्या वर्धापनदिनानिमित्त हा विषय चर्चेला घेण्यात आला आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने व प्रास्ताविक एड. राजू बागूल यांनी केले. या कार्यशाळेला गोविंद कांबळे, महादेव डांबरे, डॉ. व्ही. एच. कांबळे, प्रा. भारत सिरसाठ, अन्वर अलमनूर जाफर, सत्यापाल धोटे, प्रा. सुवार्ता राऊत, एड. राजू बागूल, संकेत चव्हाण, अमित खिल्लारे, अरुण इंगळे, धनराज गोंडाणे, एड. अरुण शेजवळ, डॉ. आर. के. क्षिरसागर, टी. एन. थोरात, एस. ओ. इंगळे, बी. एस. बनसोडे, एड. आर. टी. खंदारे, साधू आनंद, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे एड. विलास रामटेके यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE